(1)

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ.

4था मजला, एक्सप्रेस टॉवर्स,
नरिमन पॉईंट, मुंबई - 21.

दिनांक : 7/10/1995.

विषय :- दि.2/9/1995 (शनिवार) रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या 67व्या सभेचे कार्यइतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 67वी सभा शनिवार दि.2/9/1995 रोजी मा. बाबासाहेब धाबेकर, राज्यमंत्री, ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष, यांचे अध्यक्षतेखाली, एक्सप्रेस टॉवर्स येथील मंडळाच्या कार्यालयात, सदस्य सचिव यांच्या दालनात घेण्यात आली. सदर सभेस विशेष निमंत्रित म्हणून मा. रविंद्र माने, राज्यमंत्री, नगर विकास उपस्थित होते. सदर सभेचे कार्यइतिवृत्त (पृ.क्र.1 ते 17) सोबत मान्यतेकरीता सादर करीत आहे.

मा. राज्यमंत्री, नगर विकास, वित्त व नियोजन यांनी मागितलेली दि.1/10/1995 ची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | अंदाजपत्रकीय तरतूद | दि.1/10/95 पर्यंत मिळालेले अनुदान व टक्केवारी. | मंडळाने दि.1/10/95 पर्यंत केलेला खर्च | |
|---|---|---|---|---|
| 1. नागरी (अनुदान, तातडीच्या योजनांसाठीचे अनुदान व कर्ज.) | 140 कोटी | 5.26 कोटी (3.74 टक्के) | 36.00 कोटी | 1) ओव्हर ड्राफ्ट रू.9.50 कोटी. 2) कामे मंद गतीने - खर्चात वाढ - देयके वेळेवर न देता आल्यामुळे कंत्राटदारांची कामात चालढकल. 3) दि.1/12/95 रोजी रू.22 कोटीचा कर्जाचा हप्ता देणे आहे. मंडळाकडे पैसे नाहीत. |
| 2. ग्रामीण (अनुदान) | 188 कोटी | 65.00 कोटी (34.61 टक्के) | 40.00 कोटी | |
| | 328 कोटी | 70.00 कोटी 21.35 टक्के | 76.00 कोटी | |

(रा. मा. सगणे) 6/10/95
सदस्य सचिव.

मा.उपाध्यक्ष व राज्यमंत्री, ग्राम विकास.

मा. राज्यमंत्री (नगर विकास)

मा.अध्यक्ष व मुख्यमंत्री (माहितीसाठी)

Recd. In C.M.'s Sectt.

(2)

## महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ

दिनांक 2.9.95 (शनिवार) रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या 67 व्या सभेचे इतिवृत्त.

---

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची 67 वी सभा, शनिवार दि.2.9.95 रोजी दुपारी 2.00 वाजता, मंडळाचे मा.अध्यक्ष व मुख्यमंत्री, नगर विकास यांना वेळे अभावी उपस्थित रहाता येत नसल्याने, त्यांचे अनुमतीने मा.बाबासाहेब धाबेकर, राज्यमंत्री, ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष, यांचे अध्यक्षतेखाली एक्सप्रेस टॉवर्स येथील मंडळाच्या कार्यालयात सदस्य सचिवांचे दालनात घेण्यात आली. सदर सभेस विशेष निमंत्रीत म्हणून मा.राज्यमंत्री, नगर विकास श्री.रविंद्र माने उपस्थित होते. सदर सभेस मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1. श्री.बाबासाहेब धाबेकर,
   उपाध्यक्ष, म.पा.पु.व ज.नि.मंडळ, व
   मा.राज्यमंत्री, ग्राम विकास.

2. श्री.डी.टी.जोसेफ,
   सचिव, नगर विकास विभाग.

3. श्री.एम.के.गोखले,
   सदस्य.

4. श्री.चौ.गो.चाबूकस्वार,
   उप सचिव (खर्च, वित्त विभाग)

5. श्री.राजेंद्र मा.सगणे,
   सदस्य सचिव,
   म.पा.पु.व ज.नि.मंडळ.

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यांत आली.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1. श्री.शै.दो.अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प)
2. श्री.दि.के.भसाळे, मुख्य अभियंता (नागरी)
3. श्री.सं.वि.शेळकीकर, मुख्य अभियंता (ग्रामीण)
4. श्री.सु.का.पाटील, मुख्य अभियंता (जागतिक बँक)
5. श्री.ज.बा.आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
6. श्री.सु.पु.कळमकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी.

मंडळाचे सदस्य सचिव श्री.राजेंद्र सगणे यांनी प्रथम मंडळाचे उपाध्यक्ष व राज्यमंत्री, ग्राम विकास श्री.बाबासाहेब धाबेकर व विशेष निमंत्रित राज्यमंत्री, नगर विकास श्री.रविंद्र माने यांचे मंडळाच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले. तद्नंतर मंडळाचे उपाध्यक्ष व मा.राज्यमंत्री, ग्राम

..2.

विकास श्री.धाबेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामास सुरूवात केली. श्री.धाबेकर यांनी असे नमूद केले की, आजवर राज्य शासनाने मंडळाबाबत आपले कर्तव्य पार न पाडल्यामुळे मंडळ सतत अडचणीत आलेले आहे. मंडळाच्या आर्थीक अडचणीला व इतर परिस्थितीला निव्वळ मंडळच जबाबदार नाही. मंडळाला अधिक मजबूत करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन करून त्यांनी असे नमूद केले की, मंडळांवर होणारी टिका रास्त नाही. त्यानंतर मंडळाचे सदस्य सचिव श्री.सगणे यांनी थोडक्यात मंडळाचा कार्याचा आढावा घेतला व मंडळाला येणा-या विविध अडचणी विषद केल्या. त्यांनी असे नमूद केले की, योजनांचे हस्तांतरण झाल्यानंतर त्याची देखभाल योग्य रितीने होत नसल्यामुळे मंडळाला विविध प्रकारच्या टिकेला तोंड द्यावे लागते. योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यास होणारा विलंब, गरजेपेक्षा निधी कमी मिळणे व तोही वेळेवर न मिळणे यामुळे योजना रखडतात व विलंब होतो. तसेच नगरपालिका/स्थानिक संस्था यांच्याकडून यावयाची थकबाकीची रक्कम फार मोठया प्रमाणावर वाढली आहे. व त्यामुळे "योजनांतर्गत" निधी "योजनेत्तर" कामासाठी वळवावा लागतो. त्यामुळे मंडळ आर्थिक दृष्टया अडचणीत आले आहे. सचिव, नगर विकास यांनी मा.राज्यमंत्री, नगर विकास यांना उद्‌देशून अशी विनंती केली की, नियोजन व वित्त विभाग त्यांच्याकडेच असल्याने मंडळाला भेडसावणा-या आर्थीक अडचणी सोडविण्यासाठी मा.राज्यमंत्र्यांनी लक्ष घातल्यास त्याचा निश्चितपणे फायदा होवून अशा अडचणी दूर होऊ शकतील. यावर मा.राज्यमंत्री, नगर विकास यांनी या संबंधी सर्व संबंधितांची लवकरच बैठक बोलावून मंडळाच्या आर्थीक अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासन दिले. त्यानंतर मंडळाच्या कार्यक्रम बाबी क्रमवार विचारात घेण्यात आल्या.

**कार्यक्रम बाब क्र.1**

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 66 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.2**

मंडळाच्या 66 व्या बैठकीतील बाबीवर करण्यांत आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.3**

सुर्या प्रकल्पावर आधारित वसई विरार पाणी पुरवठा योजना टप्पा-1 ची कामे बी.एम.आर.डी.ए.ची पूर्णठेव योजना म्हणून हाती घेण्याच्या प्रस्तावाबाबत मुख्य अभियंता, श्री.अरमाळ यांनी माहिती दिली, व हया प्रकल्पाचे मोठे व एका ठिकाणी असलेले काम व निधीची उपलब्धता लक्षात घेऊन खास बाब म्हणून या प्रकल्पासाठी 17.50% ऐवजी 14% एवढेच ई.टी.पी.चार्जेस आकारण्यास हरकत नसावी असा ठराव मंडळापुढे मांडला. याबाबत मंडळाचे सदस्य श्री.गोखले यांनी असे सुचविले की, एखाद्या विशिष्ट योजनेसाठी ई.टी.पी.चार्जेसमध्ये बदल करण्यापेक्षा यासाठी एक सर्वसाधारण नियम करावा. त्याचप्रमाणे याबाबत असे ठरले की, ज्या योजना 75 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीच्या असतील व ज्यांचे काम एकाच ठिकाणी असेल व खात्रीलायक आगाऊ निधी पुरवठयाची हमी असेल अशा प्रकल्पांना सवलतीच्या दराने म्हणजे 14% दराने ई.टी.पी.चार्जेस आकरण्यात यावे. निधी पुरवठा विलंबाने झाल्यास जास्तीच्या दराने ई.टी.पी. लावली जाईल अशा त-हेची अट करारात असावी.

चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, ज्या प्रकल्पाची किंमत ई.टी.पी.चार्जेस धरून रू.75 कोटी पेक्षा अधिक असेल व त्या प्रकल्पाचे काम एकाच ठिकाणी एकवटलेले असेल व खात्रीलायक

आगाउ निधी पुरवठयाची हमी मिळणार असेल तर असे प्रकल्प 17 1/2% ऐवजी 14% ई.टी.पी.चार्जेस लावून पुर्णठेव योजना म्हणून मंडळाने कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. असे ठरविण्यात येते की, अशा प्रकल्पासाठी निधी वेळेवर मिळेल याची खात्री करारातच अंतर्भूत करून घ्यावी व निधी उपलब्ध करून देण्यास विलंब झाल्यास 17.50% या दराने ई.टी.पी.चार्जेस लावण्यात येतील अशीही तरतूद करारातच करण्यात यावी.

मंडळ असा ठराव करते की, सूर्या प्रकल्पावर आधारित उप प्रादेशिक वसई विरार पाणी पुरवठा योजना टप्पा-1, किंमत रू.69.97 कोटी निव्वळ या बी.एम.आर.डी.ए. तर्फे घेण्यात येणा-या मोठया पाणी पुरवठा प्रकल्पाचे कामासाठी म.पा.पु.व ज.नि.मंडळ पूर्णठेव योजना तत्वावर असल्याने वरील ठरावानुसार 14% ई.टी.पी.चार्जेस लावून ते काम स्विकारण्यास मंडळ शासनास शिफारस करीत आहे.

बी.एम.आर.डी.ए. बरोबर योग्य तो करारनामा करण्यास सदस्य सचिव हयांना मंडळ अधिकार देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.5 व कार्यक्रम बाब क्र.4.** मंडळाच्या 64 व्या सभेत ठरल्याप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या 5 सदस्यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालास मंडळाची मान्यता मिळावी असा प्रस्ताव मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी सादर केला. या संदर्भात सदस्य सचिव तसेच समितीचे अध्यक्ष व सचिव, नगर विकास यांनी खुलासा केला. समितीने केलेल्या शिफारशीनुसार खालील ठराव मंजूर करण्यांत आले.

ठराव - 4.

असा ठराव करण्यात येतो की, मे.हैड्रोलिक्स ॲन्ड जनरल इंजिनिअर्स यांच्या अहमदनगर मलनिःसारण योजनेच्या 10.5 द.ल.क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्राच्या कामाच्या निविदेतील (कार्यकारी अभियंता, प.अ.बां.वि.अहमदनगर यांची स्वीकृत निविदा क्र.बी.2/5, 1980-81) कंत्राटाच्या किंमतीच्या म्हणजेच रू.42,55,000/- च्या 10% इतकी एस्केलेशन देणेची अट शासनाच्या वित्त विभागाच्या दि.6 जून,1984 चे संबंधाने शिथिल करण्यास मंडळाची मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रत्यक्षात फॉर्म्युल्यानुसार येणा-या एक्सलेशनच्या रकमेच्या 75% म्हणजेच रू.11,28,877/- इतके एस्कलेशन मे.हैड्रोलिक्स ॲन्ड जनरल इंजिनिअर्स यांना देणेस मंजूरी देणेत येत आहे. त्यापैकी रू.3,33,993/- इतकी भाववाढीची रक्कम मूळ निविदेतील तरतूदीनुसार सदर कंत्राटदारास या आधीच अदा करणत आली असून आता उर्वरित रू.7,94,884/- (रूपये सात लक्ष चौ-याण्णव हजार आठशे चौ-यांऐंशी) इतकी रक्कम अदा करावी व रक्कम अदा करताना या कामाबद्दल कोणताही क्लेम शिल्लक नाही असे ठेकेदाराकडून लेखी प्रतिज्ञापत्र प्राप्त करून घ्यावे. तसेच, जास्त रक्कम अदा झाल्यास ते त्वरित व्याजासह एकरकमी परत देण्याबाबत देखील प्रतिज्ञापत्र कंत्राटदाराकडून घेण्यात यावे.

ठराव - 5.

असा ठराव करण्यात येतो की, मेसर्स तापी प्रिस्टेस्ड प्रॉडक्टस, भुसावळ यांनी हाती घेतलेले "औरंगाबाद शहर वितरण व्यवस्थेची पुनर्रचना योजना टप्पा-1 मधील 1400 मि.मिटर व्यासाची प्रिस्टेस्ड कॉक्रीट गुरूत्व वाहिनी टाकण्याचे कामामध्ये उच्च दाबाच्या तारांच्या किंमतीत अतोनात वाढ झाल्यामुळे, ठेकेदाराची, दरातील रक्कम मिळण्याबाबतची मागणी संयुक्तीक आहे, तसेच हया

प्रस्तावाला एस्केलेशन समितीची मान्यता आहे, म्हणून भाववाढीमुळे झालेल्या फरकाची रक्कम रू.15,40,620/- ठेकेदारास अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.6**

नव्या मुंबई क्षेत्रातील न्हावा शेवा उप प्रादेशिक विभागासाठी प्रगतीपथावर असलेल्या मोर्बे धरणातून नवीन मुंबई, सिडको क्षेत्रासाठी पाणी आणण्याकरिता टप्पा-3 पाणी पुरवठा योजना 12.5 द.ल.लिटर्स प्रति ताशी क्षमता असलेल्या जलशुध्दीकरण केंद्राचे संकल्पचित्र तयार करून बांधण्याच्या कामाच्या निविदा बाबत मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी माहिती दिली व सदर निविदा रू.5.00 कोटी पेक्षा जास्त असल्याने त्याला मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे असा प्रस्ताव सादर केला. सदर कामासाठी एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी ठेकेदार मे.ए.के.मुखर्जी, नागपूर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रक्कमेच्या 20% कमी होता. ठेकेदारांचा अनुभव, मागील दिलेल्या कामाची प्रगती, त्यांच्याकडे असलेली साधन सामुग्री इ. लक्षात घेता प्रस्तावात नमुद केलेला ठेकेदार मे.ए.के.मुखर्जी, नागपूर यांची निविदा स्वीकारण्यास मंडळाने मान्यता दिली असून खालील ठराव मंजूर करण्यांत आला. तथापि, मंडळाने अश्या कमी दराने आलेल्या निविदांच्या बाबतीत अभ्यास करणे आवश्यक आहे. गेल्या दोन वर्षात मान्य केलेल्या अशा कामांचे बाबतीत खालील बाबीवर माहिती गोळा करावी, असे मा.राज्यमंत्री (न.वि.) यांनी सूचविले.

1. विहित कालावधीपेक्षा विलंब किती?
2. अतिरिक्त दरसूच्या किती झाल्यात?
3. परिमाणांत किती वाढ झाली ?
4. कुठल्या कुठल्या बाबीमध्ये मंडळाचे प्रचिलीत दर हे कंत्राटदारांनी भरलेल्या दरापेक्षा जास्त आहेत.

ठराव :

रू.12,01,08,000/- (रूपये बारा कोटी एक लाख आठ हजार फक्त) किंमतीची मे.ए.के.मुखर्जी, नागपूर यांची कमीत कमी किंमतीची रिस्पॉन्सीव्ह व तांत्रिक दृष्टया योग्य असलेली निविदा स्विकारण्यास मंडळ मान्यता देत आहे. या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.7**

नव्या मुंबई क्षेत्रातील न्हावा शेवा उप प्रादेशिक विभागासाठी प्रगतीपथावर असलेल्या मोरबे धरणापासून नवी मुंबई, सिडको क्षेत्रासाठी पाणी आणण्याकरिता टप्पा-3 पाणी पुरवठा योजनेंतर्गत असलेल्या शुध्द पाण्याच्या गुरूत्ववाहिनी व उर्ध्व वाहिनीसाठी भोकरपाडा ते कळंबोली 1954 मि.मि. (बाहेरील व्यास) 12 मी.मी. 2050 मि.मि.(बाहेरील व्यास) 10 मि.मि.जाडी व 1700 मि.मी. (बाहेरील व्यास) 10 मि.मी.जाडीचे लोखंडी पाईप तयार करणे, पुरविणे या कामांचे निविदाबाबत मुख्य अभियंता (प्रकल्प) हयांनी माहिती दिली व सदर निविदा रू.5.00 कोटीपेक्षा जास्त असल्याने त्याला मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे असा प्रस्ताव सादर केला. सदर कामासाठी एकूण (5) पांच निविदा प्राप्त झाल्या असून त्यामध्ये ठेकेदार मे.सुरेंद्र इंजिनिअरींग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेच्या 4% कमी होता. मे.सुरेंद्र इजिनियरींग कंपनी, मुंबई या ठेकेदाराने मंडळाच्या अधिपत्याखाली अशाच प्रकारची कामे केली आहे व ती समाधानकारक असल्याने

ठेकेदाराचा अनुभव, त्यांचेकडे असलेली साधनसामुग्री व आर्थीक क्षमता लक्षात घेता प्रस्तावात नमुद केलेल्या ठेकेदार मे.सुरेंद्र ईंजिनिअरींग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांची निविदा स्वीकारण्यास मंडळाने मान्यता दिली असून खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव :

रू.19,89,09,749/- (रूपये. एकोणीस कोटी, एकोणनव्वद लाख, नऊ हजार, सातशे एकोणपन्नास फक्त) किंमतीचे मे.सुरेंद्र ईंजिनिअरींग कंपनी प्रा.लिमिटेड, मुंबई यांचे कमीत कमी किंमतीची, रिस्पान्सीव्ह व तांत्रिक दृष्टया योग्य असलेली निविदा स्विकारण्यास हे मंडळ मान्यता देत आहे.

या प्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांस मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.8**

गिरीस्थानासाठीची पाणीपुरवठा केंद्र चालविण्यासाठी शासनाकडून म.पा.पु.व ज.नि.मंडळास वित्त सहाय्य मिळणे बाबत.

गिरीस्थानांची पाणीपुवठा केंद्रे चालविण्यासाठी मंडळाला येणारा तोटयाचा भार शासनास वर्ग करणे उचित होणार नाही असे सचिव, नगर विकास विभाग यांनी सुचविले व हा तोटा बिगर घरगुतीचे दर वाढवून अथवा अन्य करा बरोबर (म्हणजे एन्ट्री, टॅक्स, टूरिस्ट टॅक्स बरोबर) वॉटर टॅक्स लावता येऊन वसूल करता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करून तसा प्रस्ताव शासनास सादर करावा. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांनी असेही सुचविले की, असा प्रस्ताव प्रथम माथेरान, महाबळेशवर व पांचगणी साठी, की ज्या ठिकाणी जास्त प्रवासी येतात, अशा ठिकाणीसाठी करावा.

**कार्यक्रम बाब क्र.9**

हस्तांतर केलेल्या पाणी पुरवठा योजनांची देखभाल व्यवस्थीत न झाल्यामुळे योजनांची झालेली दुरावस्था.

पाणी पुरवठा बाबी संबंधी हल्ली झालेल्या श्वेतपत्रीकेवरील चर्चा लक्षात घेऊन नवे धोरण निश्चित करावे असे ठरले. कोल्हापूरची फिल्ट्रेशनची पध्दत फार चांगली असून तिचा सर्वत्र वापर करण्याबाबत विचार करावा असे मा.राज्यमंत्री, नगर विकास यांनी सुचना दिल्या.

**कार्यक्रम बाब क्र.10**

ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या योजनांबाबत आराखडा तयार करण्यासाठी अस्थापित केलेल्या मंत्रीमंडळ उप समितीचा अहवाल.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठयाचे काम गुणवत्तापूर्वक होण्याच्या दृष्टीने मंत्रीमंडळ उपसमितीने शिफारशी केल्यानुसार शिफारशींची अंमलबजावणी करताना येणा-या अडचणीबाबत सदस्य सचिवांनी मंडळाला माहिती दिली, त्यावर चर्चा होऊन (1) प्रत्येक योजनेसाठी सर्व उपांगाचा समावेश असलेली एकच निविदा काढण्याऐवजी दोन निविदा काढण्यास परवानगी

असावी. व (2) पाईप्स् खेरीज सिमेंटसह सर्व साहित्य सामुग्री कंत्राटदाराने आणावी असे ठरले व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

शासनाच्या ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.ग्रापापु.1093/सीआर.448/(अ)/39-अ, दि.17 सप्टेंबर,1994 अन्वये ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसाठी सर्व कामाची एकच निविदा काढणे व ठेकेदारास कामाचा ठेका साहित्य सामुग्रीसह देणे याबाबत आदेश आहेत. त्याचा पुनर्विचार करून ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करताना पंपिंग मशिनरी व जलशुध्दीकरण केंद्र या विशिष्ट कामासाठी स्वतंत्र निविदा बोलावण्याची परवानगी द्यावी. तसेच उद्‌भव, जलवाहिनी, पाण्याच्या टाक्या व इतर कामांसाठी एकच निविदा काढून व दर करारानुसार असलेले पाईप्स् सोडून इतर सर्व साहित्य कंत्राटदाराने स्वतः आणावे, ज्यात सिमेंटचाही समावेश राहील, असा प्रस्ताव शासनास पाठविण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यात यावे.

**कार्यक्रम बाब क्र.11**

म.पा.पु.व ज.नि.मंडळातील निम्नश्रेणी लघुलेखकांना रू.1640-2900 ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे बाबत.

म.पा.पु.व ज.नि.मंडळ हा शासनाचा अंगिकृत व्यवसाय आहे. मंडळाने शासनाचे नियम सेवाशर्ती लागू केले आहेत. मंडळातील लघुलेखकांना शासन निर्णयाप्रमाणे दि.22.4.94 प्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची पार्श्वभूमि विषद करण्यांत आली. यावर थोडक्यात चर्चा होऊन खालील ठराव मंजूर करण्यांत आला. तथापि शासनाकडून मान्यता मिळाल्याखेरीज सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात येऊ नये असे सचिव, नगर विकास यांनी स्पष्ट कले व खालील प्रमाणे ठराव संमत झाला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, म.पा.पु.व ज.नि.मंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या निम्नश्रेणी लघुलेखकांना वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.वेपूर.1290/प्र.क्र.74/94/लेखा10 मंत्रालय, मुंबई-32 मधील तरतुदीनुसार दि.1.1.86 पासून सुधारित वेतनश्रेणी रू.1640-2900 देण्यास मंडळ या ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

शासनाकडून वरील सुधारित वेतनश्रेणी देण्यास मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यास मंडळ संमती देत आहे. तथापि शासनाकडून मान्यता मिळाल्याखेरीज सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात येऊ नये.

**कार्यक्रम बाब क्र.12**

विषय :- अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणे बाबतचा श्रीमती विमल पिराजी सैदाणे यांचा अर्ज.

वरील विषयाबाबत चर्चा झाली. अनुकंपा तत्वावर श्रीमती सैदाणे यांना सेवेत घेण्याविषयीचा खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, श्री.डी.टी.सैदाणे, मजूर यांचे मृत्यूमुळे अनुकंपा तत्वावर नोकरीस पात्र असलेला त्यांचा मुलगा क्षयरोगपिडीत व काम करण्यास अपात्र असल्याने त्यांची (मुलाची) पत्नी श्रीमती विमल पिरोजी सैदाणे यांना खास बाब म्हणून नोकरी देणे बाबत मंडळ या ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.13**

मंडळातील अभियंत्यांना व्यावसायिक संस्थांच्या सदस्यांच्या वर्गणीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती अदा करणे बाबत. या कार्यक्रम बाबीची चर्चा होऊन प्रस्ताव शासनाकडे सादर करावा असे ठरले. खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, शासनाच्या दि.30.3.83 च्या आदेशानुसार मंडळाच्या वर्ग-1 व वर्ग-2 च्या अभियंत्यांना कोणत्याही 2 व्यावसायिक व तांत्रिक संस्थांच्या सदस्यत्वाच्या वार्षिक वर्गणीच्या 50% इतकी प्रतिपूर्ती देण्यात यावी. ही प्रतिपूर्ती प्रतिवर्षी रू.15,000/- या मर्यादेत असावी व ही कार्यवाही मध्यवर्ती कार्यालयाने करावी.

असाही ठराव करण्यांत येतो की, शासनाच्या दि.14.9.93 च्या आदेशानुसार मंडळाचे जे वर्ग-1 व वर्ग-2 चे अभियंते "इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन" या संस्थेचे सदस्यत्व घेऊ इच्छित असतील त्यांना सदरहू संस्थाकडे भरलेली वार्षिक वर्गणी 100% प्रतिपूर्ती योग्य असावी. त्यासाठी वार्षिक रू.15000/- ही मर्यादा राखून ठेवण्यांत यावी. ही प्रतिपूर्ती केंद्रीय कार्यालयामार्फत देण्यांत यावी.

याबाबत शासनाची पूर्व संमती घ्यावी.

**कार्यक्रम बाब क्र.14**

नाशिक येथे गुणनियंत्रण उपकक्ष निर्माण करून देणे बाबत.

मंडळात सध्या असलेल्या गुणनियंत्रण कक्षा बद्दल माहिती देऊन सध्या असलेली गुणनियंत्रण कक्षाची यंत्रणा अपुरी असल्याने नाशिक येथे आणखी एक उप कक्षाची आवश्यक असल्याचा प्रस्ताव मंडळाचे सदस्य सचिवांनी मांडला. या कक्षात वरील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे नवीन पदे निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. यावर गुणनियंत्रण कक्षातील कामाची कार्यक्षमता त्या पदावरील नेमणूका व त्यांना प्रोत्साहन देण्याबाबत इतर बाबीबाबत सविस्तर चर्चा होऊन प्रस्ताव शासनाला सादर करावा व मंजूर करून घ्यावा असे ठरले. या कक्षातील अधिकारी नियमितपणे बदलावेत व त्यांना योग्य विदेशी प्रशिक्षणाची संधी देण्यात यावी असेही सुचविण्यात आले.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, म.पा.पु.व ज.नि.मंडळातील गुण नियंत्रण कक्षाकरिता नाशिक येथे नवीन उपकक्ष निर्माण करण्यासाठी व सध्या अस्तित्वात असलेल्या औरंगाबाद, पुणे व नागपूर या उपकक्षात प्रत्येक एक अशा तीन उप अभियंत्यांची पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. याबाबत शासनाची मंजूरी मिळविण्यासाठी सदस्य सचिव यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.15**

रूपांतरीत अस्थायी/स्थायी आस्थापनेवरील विहित माध्यमाव्दारे नियुक्त न झालेल्या कर्मचा-यांना विशेषतः कारकून या श्रेणीतील कर्मचा-यांना नियमित अस्थायी आस्थापनेवर कनिष्ठ लिपिक, अनुरेखक, सहा.भांडारपाल, टंकलेखक इ.पदावर नेमणूक देण्या संबंधी.

या विषयी चर्चा होऊन सदर प्रस्ताव शासनास सादर करावा असे ठरले.

**ठराव :**

ठराव करण्यांत येतो की, मंडळामध्ये ज्या कर्मचा-यांची मूळ नेमणूक सेवायोजन कार्यालयामार्फत किंवा विहित माध्यमामार्फत झाली नाही व जे कर्मचारी रूपांतरीत अस्थायी/स्थायी आस्थापनेवर कार्यरत आहेत व ते कनिष्ठ लिपिक, सहा.भांडारपाल, अनुरेखक, टंकलेखक, वाहनचालक या नियमित अस्थायी आस्थापनेवरील पदासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता धारण करतात त्यांना मंडळामधील रिक्त पदी व रिक्त होणा-या पदी नेमणूका देण्यात याव्यात व शासन निर्णयामधील मूळ नेमणूकीच्यावेळी सेवायोजन कार्यालयाची अट शिथील करण्याची शिफारस शासनाला करण्यासाठी सदस्य सचिवांना अधीकृत करावे.

**कार्यक्रम बाब क्र.16**

अमोनिया प्रिंट अलाऊंस.

याबाबत चर्चा होऊन खालील ठराव मंजूर करण्यात आला. प्रस्ताव शासनास सादर करावा असेही ठरले.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, म.पा.पु.व ज.नि.मंडळामध्ये जो कर्मचारी स्वतःच्या पदाच्या कामाची जबाबदारी सांभाळून, अमोनिया प्रिंट मशिनवर काम करतो, त्याला या कामाबाबतचा मोबदला म्हणून दरमहा रू.25/- (रूपये पंचवीस मात्र) "खास भत्ता" देण्याची शिफारस शासनाला करावी.

**कार्यक्रम बाब क्र.17**

विषय :- वाहन भत्ता.

भांडार शाखेत काम करणा-या कर्मचा-यांना कामाच्या आवश्यकतेनुसार 24 तासात कोणतेही साहित्य काढून देणेसाठी किंवा आलेले साहित्य स्विकारण्यासाठी स्वतःचा अतिरिक्त खर्च करावा लागतो. अशा खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी म्हणून भांडार शाखेतील कर्मचा-यांना रू.100/- वाहनभत्ता देण्यात यावा असा ठराव मंडळासमोर सादर करण्यात आला. मंडळाने तो मान्य केला व खालील प्रमाणे ठराव संमत केला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, भांडार शाखेत काम करणा-या कर्मचा-यांना कामाचे आवश्यकतेनुसार 24 तासातून केंव्हाही भांडार शाखेतून साहित्य देण्यासाठी किंवा साहित्य त्वरित देण्यासाठी/स्विकारण्यासाठी जावे लागते व हयासाठी त्यांना स्वतःचे वाहनाकरिता अतिरिक्त खर्च करावा

लागतो. अशा खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून अशा कर्मचा-यांना रू.100/-(रूपये शंभर मात्र) दरमहा वाहन भत्ता देण्यात यावा अशी शिफारस करण्यांत येत आहे व प्रस्ताव पाठविणेकरिता सदस्य सचिव यांना अधिकार देण्यात यावेत.

मंडळ असाही ठराव करते की, अशा प्रकारच्या किरकोळ बाबीची यादी तयार करून अशा बाबी सदस्य सचिवांच्या अधिकारात मंजूर करून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर करून घ्यावा.

**कार्यक्रम बाब क्र.18**

विषय :- पदवी/पदविकाधारक कर्मचा-यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत.

या प्रस्तावावर चर्चा होऊन शासनात अशी सवलत नसल्याने सदर प्रस्ताव फेटाळण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.19**

विषय :-मंडळातील अभियंत्यांना आपल्या खात्याव्यतिरिक्त इतर खात्याची तांत्रिक छाननीची तसेच तांत्रिक मंजूरी देण्याची कामे केल्याबाबत अतिरिक्त भत्ता मंजूर करण्याबाबत.

या बाबीमध्ये विशद केलेली वितलब्धी शासनामध्ये प्रचलित असलेल्या पध्दतीनुसारच असल्याने हा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाला पाठवावा असे ठरले व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला. या प्रस्तावास पूर्वलक्षी प्रभाव देण्याबाबत नंतर विचार करावा असे ठरले.

ठराव :

महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या कामाशी संलग्न नसलेले खाजगी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामांची तांत्रिक छाननी व त्यास मंजूरी देणे व चाचणी प्रयोग, तसेच संयंत्रणाबाबतची काम मंडळामार्फत केली जातात व त्याबाबत मंडळाने ठरवून दिलेल्या प्रमाणात, मंडळ संबंधित संस्थाकडून फी/मोबदला घेतो, अशा प्रकारे वसूल झालेल्या रक्कमेपैकी सर्व रक्कम मंडळाकडे जमा होते. ज्या योजना मंडळामार्फत कार्यान्वित होणार नसतील अशा योजनांचे बाबतीत मंडळाकडे जमा असलेल्या एकूण रक्कमेपैकी 50% रक्कम महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभागाच्या मेरी संस्थेतील कामकाजाच्या धर्तीवर मंडळातील अधिका-यांना व कर्मचा-यांमध्ये वाटून देण्यात यावी, याबाबत शासनास प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविणेकरिता सदस्य सचिव यांना अधिकार देण्यात यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.20**

विषय :-म.पा.पु.व ज.नि.मंडळाच्या वैद्यकीय सेवाशर्ती नियम, 1980 मध्ये काही शर्तीचा समावेश करण्याबाबत.

मंडळाचे वैद्यकीय नियम स्वतःचे आहेत त्यामध्ये काही शर्तीचा समावेश करण्याबाबत मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी मंडळापुढे प्रस्ताव सादर केला व या बाबतीत सध्या सदस्य सचिवांना असलेले अधिकार मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना प्रदान करण्यात यावे अशा प्रकारचा प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्यांत आला व खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, सोबतच्या विवरणपत्रात निर्देशित केलेल्या 21 आकस्मिक आजारापैकी असेल व त्या प्रकारचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकाने दिले तर, त्या कर्मचा-यांच्या त्या आजारावरील खाजगी रूग्णालयांतील औषधोपचाराच्या खर्चाची, प्रतिपूर्ती देण्यात यावी. या प्रतिपूर्तीचे प्रमाण सोबतच्या विवरणपत्रामध्ये विहित केल्याप्रमाणे असेल. मात्र अशा प्रतिपूर्ती जास्तीत जास्त रू.20,000/- या मर्यादेपर्यंत देता येईल. अशा प्रकारच्या प्रकरणी मंजूरी देण्याचा अधिकार मंडळाच्या मुख्य प्रशासकीय अधिका-यांना देण्यात येत आहे.

असाही ठराव करण्यात येतो की, मंडळाच्या कर्मचा-यांच्या आई किंवा वडिलांचे एकत्रीत मासिक उत्पन्न रू.500/- किंवा कमी असेल अशाच आईवडिलांना त्यांच्यावरील औषधोपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी अवलंबित म्हणून समजण्यात यावे. अशा प्रकारे मंडळाचे वैद्यकिय सेवाशर्ती नियमात योग्य तो बदल करण्यात यावेत व शासनाच्या अनुमतीने ते अंमलात आणण्यात यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.21**

विषय :- स्वीय सहाय्यक पद निर्माण करणे बाबत.

या विषयावर चर्चा केल्यानंतर मंडळ अशा निष्कर्षास आले की, प्रस्तावामध्ये विशद केलेल्या वस्तुस्थितीचा विचार करता पदे एकाच कार्यालयात नसल्यामुळे अशी पदे निर्माण करणे योग्य होणार नाही.

**कार्यक्रम बाब क्र.22**

विषय :-चतुर्थश्रेणी कर्मचा-यांपैकी फक्त टपाल वाटप करणा-या कर्मचा-यांना छत्री ऐवजी रेनकोट देण्याबाबत.

या प्रस्तावावर चर्चा होऊन सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, मंडळातील चतुर्थश्रेणी शिपाई पदावरील कर्मचा-यांपैकी जे टपाल वाटपाचे काम करतात त्यांना यापुढे छत्रीऐवजी रेनकोट वाटप करण्याची शिफारस करण्यात येत आहे व या प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यासाठी मंडळाच्या सदस्य सचिवांना अधिकार देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.23**

विषय :- झेरॉक्स चक्रमुद्रीत यंत्र चालकांची पदे मंजूर करणे बाबत.

या प्रस्तावावर चर्चा होवून प्रस्ताव मंजूर करण्यात आला व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

(12)

ठराव :

म.पा.पु.व ज.नि.मंडळाच्या आस्थापनेवर अस्तित्वात असलेल्या वर्ग-4 कर्मचा-यांच्या शिपायांच्या एकूण 44 पदांपैकी 4 पदांची रू.750-940 या वेतनश्रेणी ऐवजी रू.775-1150 इतकी श्रेणीवाढ करून झेरॉक्स यंत्रचालक पदात रूपांतर करण्यास मंडळ या ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

शासनाकडून वरील प्रस्तावास मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यास मंडळ संमती देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.24**

विषय :-महा.पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, वेणा पाणीपुरवठा योजना, जि.नागपूर अस्तित्वात असलेल्या 750 मि.मिटर व्यासाच्या 12,500/- मिटर लांबीच्या बीडाच्या पाईप लाईनच्या काही जॉईंट्ची दुरूस्ती करणे बाबत प्रस्ताव.

वेणा पाणीपुरवठा योजनेच्या पाईप लाईनच्या दुरूस्तीची आवश्यकता मंडळाला विषद करण्यात आली व ही मंडळाची योजना असल्यामुळे शासनाकडून दुरूस्तीसाठी वेगळे अनुदान मिळत नाही त्यामुळे अशा प्रकारची दुरूस्ती मंडळाच्या घसारा निधीतून करण्याची आवश्यकता आहे.

यावर श्री.गोखले, सदस्य यांनी कोणत्या प्रकारचे जॉईन्टस् बसविण्यात येणार आहेत अशा प्रकारची विचारणा केली. त्यावर मुख्य अभियंता यांनी सविस्तर माहिती सदस्यांना दिली व श्री.गोखले यांनी हया जॉईंट्सची तपासणी करावी व त्यांची अनुमती असल्यासच प्रस्तावित दुरूस्तीच्या कामाला मंजूरी देण्याचे ठरले व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

वेणा पाणी पुरवठा योजनेची अस्तित्वात असलेल्या 12500 मिटर लांब व 30 इंच (750 मि.मि.) व्यासाच्या बिडाच्या पाईप लाईनवरील जोडणीच्या ठिकाणीची गळती, लिक रिमुव्हल क्लॅप वापरून काढणे बाबतचे रू.73,45,780/- अंदाजपत्रकीय काम, मंडळाच्या घसारा निधीतून हाती घेण्यास मंजूरी देत आहे. घसारा निधीतून रक्कम काढण्याचे अधिकार सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.25**

**विषय** :- माथेरान वाढीव पाणीपुरवठा योजना, जि.रायगड.

माथेरान पाणी पुरवठा योजनेचे सध्या करावयाच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे, हे काम पूर्ण झाल्यानंतर माथेरान येथील जनतेला पुरेसे पाणी उपलब्ध होणार आहे. या प्रस्तावित कामास 100% अनुदान शासनाकडून मिळणार आहे. परंतू ही योजा मंडळाची योजना असल्याने त्याला मंडळाची मान्यता आवश्यक आहे. ही योजना केल्यानंतर माथेरान पा.पु.केंद्रामध्ये मंडळाला येणारा तोटा कमी होणार आहे असे मुख्य अभियंता (नागरी) यांनी मंडळापुढे प्रस्तावित केले. यावर खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

1) माथेरान शहराच्या पाणी पुरवठयात सुधारणा व्हावी म्हणून मंडळाने शासनास सादर

केलेली रू.114 लाख ढोबळ किंमतीची माथेरान वाढीव पाणीपुरवठा योजना (मंडळाची योजना) योजनेतील प्रस्तावीत वित्तीय आकृतीबंधासह म.पा.पु.व ज.नि.मंडळास मान्य आहे. योजना मंजूर झाल्यानंतर ती राबवण्याचे, कार्यान्वीत करण्याचे संपूर्ण अधिकार या ठरावाव्दारे मंडळाच्या सदस्य सचिव यांना देणेत येत आहेत.

2) योजना पूर्ण झाल्यानंतर योजनेची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती म.पा.पु.व ज.नि.मंडळाकडून करणेत येईल. ही योजना स्वयंसंतुलित चालवणेसाठी पाणीपट्टीत जरूर ती वाढ करेल.

**कार्यक्रम बाब क्र.26**

विषय :- संस्थांना बिगर घरगुती पाणी दर आकारणे बाबत.

या प्रस्तावाची आवश्यकता सदस्य सचिवांनी मंडळापुढे विषद केली. यावर सचिव, नगर विकास विभाग यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, हा प्रस्ताव मंजूर झाल्यास काही सेवाभावी संस्था ज्या खरोखर लोक कल्याणकारी कामे करीत असतात त्यांना तो लागू होईल. आणि अशा संस्थांना सवलत देण्यामागील मंडळाचा मूळ हेतू साध्य होणार नाही. म्हणून याबाबत प्रथम प्रमाणके निश्चित करण्यात यवीत.

**कार्यक्रम बाब क्र.27**

विषय :-म.पा.पु.व ज.नि.मंडळ, अमरावती पाणीपुरवठा योजना - मालटेकडी येथील जमिनीवरील टाकीची विशेष दुरूस्ती करणेचा प्रस्ताव.

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे जमिनीवरील पाण्याच्या टाकीच्या (जी.एस.आर.) छताची व इतर दुरूस्ती केल्यास तांत्रिकदृष्टीने हेतू कितपत साध्य होईल अशा प्रकारचा प्रश्न श्री.गोखले, सदस्य यांनी उपस्थित केला. याबाबत वेगवेगळया तांत्रिक दृष्टीने वेगवेगळया पैलूंचा मंडळाकडून विचार करण्यात यावा व या प्रस्तावाबाबत चर्चा केल्यानंतर यावर अधिक माहिती घेवून हा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.28**

विषय :- प्रकल्प कर्जाची शासनास परतफेड.

मंडळाला भेडसाविणा-या आर्थीक टंचाईमुळे मार्च,1995 अखेर रू.18.03 कोटी इतकी प्रकल्प कर्जापोटी महा.शासनास देय असलेली रक्कम मंडळाकडून अदा करण्यात आली नाही, याची मंडळाने नोंद घेतली व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, मंडळास माहे मार्च 1995 अखेर नगरपालिकांकडून थकबाकीपोटी रू.262.63 कोटी येणे आहेत. माहे जुलै,1992 पासून मंडळाचा आर्थीक कारभार अधिविकर्षावर (ओव्हरड्राफ्ट) चालू आहे. मंडळाची सध्याची आर्थीक परिस्थिती बिकट असल्यामुळे प्रकल्प कर्जापोटी शासनास माहे मार्च 1995 अखेर देय असलेली रक्कम रू.18,02,81,409 मंडळास अदा करता आली नाही, याची नोंद घेण्यात येत आहे. मंडळाची आर्थीक परिस्थिती सुधारताच ही रक्कम शासनास अदा केली जाईल.

(14)

**कार्यक्रम बाब क्र.29**

विषय :-म.पा.पु.व ज.नि.मंडळ, सिडको भवन येथील 1 ते 4 मजल्यापैकी एक मजला भाडे तत्वावर देण्याबाबत.

मंडळाच्या सिडकोभवन येथील कार्यालयामधील चार मजल्यापैकी एक मजला रिकामा आहे. तो मजला भाडे तत्वावर अन्य कार्यालयांना भाडयाने दिल्यास आर्थीकदृष्टया मंडळाला फायदेशीर होईल. याबाबतचा प्रस्ताव मंडळाला सादर करण्यात आला. याबाबत सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, ही कार्यवाही करताना बॉम्बे रेंट ॲक्टची तरतूद लागू होणार नाही याची खबरदारी घ्यावी. ती तरतुद लागू होत नसेल तरच ती जागा भाडे तत्वावर देण्यात यावी व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

सिडको भवन, नवी मुंबई येथील 1 ते 4 मजल्यापैकी 1 ला माळा (11373.32 चौ.फुटाचे (क्षेत्रफळ) योग्य त्या दराने भाडे तत्वावर देण्याबाबत मंडळ या ठरावाव्दारे मान्यता देत आहे. भाडे तत्वावर देतांना याला बॉम्बे रेंट ॲक्टची तरतूद लागू राहाणार नाही याची खबरदारी घ्यावी. याला बॉम्बे रेंट ॲक्टच्या तरतूदी लागू होणार असतील तर जागा भाडयाने देऊ नये.

या संदर्भात आवश्यक तो करारनामा करण्यास मा.सदस्य सचिव यांना या ठरावाव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.30**

विषय :-म.पा.पु.व ज.नि.मंडळास, सिडकोने न्हावा शेवा उपभाग व नवी मुंबईसाठी, मोरबे धरणापासून पा.पु.योजना करण्यासाठी दिलेल्या पूर्ण ठेव प्रकल्पासाठी नवीन विभागाच्या निर्मितीस कार्योत्तर मान्यता देणे.

या कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे नवीन विभाग उघडायाची कार्यवाहीची नोंद घेऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

म.पा.पु.व ज.नि.मंडळास, सिडकोने न्हावा शेवा उपभाग व नवीन मुंबईसाठी मोरबे धरणापासून पाणी पुरवठा योजना करण्यासाठी दिलेल्या पूर्ण ठेव प्रकल्पासाठी मंडळातील उपलब्ध पदे समयोजना करून पनवेल येथे नवीन विभागाच्या निर्मितीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.31**

विषय :-मोरबे धरण प्रकल्पावर काम करणा-या कर्मचा-यांना प्रकल्पावर राहण्याची अट शिथील करून "प्रकल्पक्षेत्र" म्हणून घोषित केल्याने प्रकल्प भत्ता देण्याबाबत.

सध्या प्रकल्पावर प्रत्यक्ष रहाणा-या अधिकारी/कर्मचारी यांना प्रकल्प भत्ता मंजूर करण्यात आला आहे. परंतू ज्या कर्मचा-यांना प्रकल्प क्षेत्रात राहण्याची सोय नाही अशा कर्मचा-यांना देखील प्रकल्प भत्ता मिळावा म्हणून प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असे ठरले व खालील प्रमाणे ठराव संमत झाला.

15

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, मोरबे धरण प्रकल्प योजनेवर प्रत्यक्ष साईटवर काम करणा-या कर्मचा-यांना, सदरहू योजना शासन निर्णय दि.4.10.94 अन्वये "प्रकल्पक्षेत्र" म्हणून घोषित केली असल्याने त्याचप्रमाणे आता प्रकल्पाधीन क्षेत्रांत नवीन निवासस्थान बांधणे संयुक्तीक नसल्याने, तसेच कर्मचा-यांना द्यावयाच्या "प्रकल्पभत्ता" हा निवासस्थानाच्या दुरूस्ती व निगा राखण्याच्या खर्चाकरिता येणा-या खर्चापेक्षा व त्यांना पूर्वीच्या मुख्यालयांत देण्यात येणा-या शहर भत्ता व घरभाडे भत्ता हयांच्याकरिता मंडळास होणा-या खर्चापेक्षा अगदीच कमी असल्याने, प्रकल्पावर राहण्याची अट शिथील करून शासन अनुज्ञेय दराने "प्रकल्पभत्ता" देण्यास मंडळ संमती देत आहे. त्याप्रमाणे सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही सदस्य सचिव यांनी करावी.

**कार्यक्रम बाब क्र.32**

विषय :-पुलगांव पाणी पुरवठा योजना (जि.वर्धा) पुलगांव पाणी पुरवठा केंद्रातील जुने पंप बदलून नवीन पंप बसविणे बाबत.

पुलगांव पाणीपुरवठा केंद्रातील जुने पंप बदलून नवीन पंप बसविण्याची आवश्यकता मुख्य अभियंता (नागरी) यांनी विषद करून सांगितली. ही योजना मंडळाची योजना असल्याने हे पंप बदलण्यासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होत नाही. म्हणून हे काम मंडळाच्या घसारा निधीतून करून घेण्याचा प्रस्ताव आहे असे सांगितले व घसारा निधीतून रक्कम काढण्यासाठी मंडळाची मान्यता आवश्यक असल्याने हा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. चर्चेअंती प्रस्ताव मंजूर करून खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

पुलगांव पा.पु.केंद्रांतर्गत अस्तित्वात असलेले जुने पंप बदलून नवीन पंप व तत्संगाने संबंधित व्हाल्व्ह व विद्युत सामुग्री बसविण्याबाबत रू.19,97,210/- ढोबळ खर्चाचे अंदाजपत्रकीय काम मंडळाच्या घसारा निधीतून घेण्यास परवानगी देण्यात येत आहे. घसारा निधीतून रक्कम काढण्याचे काम पूर्ण करून घेण्याचे अधिकार सदस्य सचिव, म.पा.पु.व ज.नि.मंडळ, मुंबई-21 यांना देण्यात येत आहेत.

(16)

## टेबल कार्यक्र बाब

**कार्यक्रम बाब क्र.1**

विषय :- मंडळाच्या वित्त व लेखा विविध पदांच्या सेवा भरतीचे नियम.

मंडळाच्या वित्त व लेखा शाखेतील विविध पदांच्या सेवाभरतीचे नियम शासनाच्या पूर्व संमतीने करणे आवश्यक असल्याने प्रस्तावातील नियम मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात यावेत असे ठरले. यापूर्वी वित्त व लेखा शाखेतील विविध पदांच्या सेवाभरतीचे नियम दि.14.8.90 रोजी 51 व्या मंडळाच्या बैठकीत मान्य केले आहेत. ते दि.9.10.90 रोजी शासनाला सादर करण्यात आले होते. शासनाचे पत्र दि.7.2.95 नुसार सुचविल्याप्रमाणे व तसेच दि.9.10.90 नंतर घडलेल्या घटनांचा व घडामोडींचा विचार करून सेवाभरती नियमाचा सुधारित प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला व तो मंडळाने मान्य केला.

**ठराव :**

ठराव करण्यांत येतो की, मंडळाच्या वित्त व लेखा शाखेतील विविध पदांसाठीच्या सुधारित प्रस्तावित सेवाभरती नियमांना मान्यता देण्यात येत आहे.

तसेच या ठरावाव्दारे सेवाभरती नियमांना शासनाची मान्यता मिळविण्यासाठी पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाच्या सदस्य सचिवांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.2**

विषय :-म.पा.पु.व ज.नि.मंडळात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना नवीन संवर्ग तयार करणे बाबत.

मंडळातील शाखा अभियंता/सहा.अभियंता,श्रेणी-2 यांना दैनंदिन कामात मदत करण्यासाठी शासन निर्णय पाटबंधारे विभाग क्र.ओएसटी.1083/480/आ (तांत्रिक) दि.31.1.80 नुसार दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे दैनंदिन कामात मदत करण्यासाठी स्थापत्य अभियंता सहाय्यक यांची आवश्यकता असल्याने त्यांची पदे निर्माण करण्यासाठी शासन, नगर विकास विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत हा प्रस्ताव मंडळापुढे ठेवण्यात आला व खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला. या संदर्भात सचिव, नगर विकास यांनी असे नमूद केले की, प्रथम 400 पदे निर्माण करावीत व त्यातील 25% पदे सरळसेवा भरतीने भरावीत. नंतर यथावकाश उर्वरित 800 पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

**ठराव :**

म.पा.पु.व ज.नि.मंडळात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांचा नवीन संवर्ग तयार करणेबाबत मंडळ या ठरावाव्दारे मान्यता देत आहे. प्रथम स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची 400 पदे निर्माण करण्यात यावीत. त्यातील 300 पदे मंडळातील अर्हताप्राप्त कर्मचा-यांनी भरावीत व उर्वरित 100 पदे सरळप्रविष्टांनी भरण्यात यावीत. नंतर यथावकाश आणखी 800 पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास पाठवावा. शासनाकडून स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची पदे निर्मितीस मान्यता मिळाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करणे बाबतचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यास मंडळ संमती देत आहे.

17

**कार्यक्रम बाब क्र.3 :**

विषय : म.पा.पु.व ज.नि.मंडळ, महाबळेश्वर पा.पु.यो., ता.महाबळेश्वर, जि.सातारा. महाबळेश्वर पाणी पुरवठा केंद्रांतर्गत कर्मचा-यांच्या निवासस्थानाची, जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत विविध उपकामांची तसेच दाबनलिका व पंपिंग मशिनरी दुरुस्तीच्या कामाचा प्रस्ताव.

महाबळेश्वर पा.पु.केंद्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या सर्व निवासस्थाने व शाखा कार्यालयाची दुरुस्ती, दाबनलिकेची दुरुस्ती, पंपिंग मशिनरी दुरुस्ती, जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत कामांची दुरुस्ती इत्यादि कामे करण्याबाबतची आवश्यकता मुख्य अभियंता (ना.) यांनी विषद केली. ही योजना मंडळाची योजना असल्याने या कामासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होत नाही. म्हणून ही कामे मंडळाच्या घसारा निधीतून करण्याचा प्रस्ताव आहे असे सांगितले व घसारा निधीतून रक्कम काढणेसाठी मंडळाची मान्यता आवश्यक असल्याने हा प्रस्ताव मांडला गेला आहे. चर्चेअंती प्रस्ताव मंजूर करुन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

"महाबळेश्वर पा.पु.केंद्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या सर्व निवासस्थाने व शाखा कार्यालयाची दुरुस्ती, दाबनलिकेची दुरुस्ती, पंपिंग मशिनरी दुरुस्ती, जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत कामांची दुरुस्ती इत्यादी कामे करणे कामी रु.21,93,700.00 ढोबळ अंदाजपत्रकीय काम, मंडळाच्या घसारा निधीतून हाती घेण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. घसारा निधीतून रक्कम काढण्याचे अधिकार सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.4 :**

विषय : केंद्रिय कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या वाहन चालकांना बसभाडे देणेबाबत.

या कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला अशा किरकोळ बाबींसाठी शासनाकडे जाण्याची आवश्यकता नाही. मात्र असे प्रत्येक प्रकरण मान्यतेसाठी सदस्य सचिवांना सादर करावे. नंतरच हा परतावा करावा.

**ठराव :**

म.पा.पु.व ज.नि.मंडळाच्या केंद्रीय कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या वाहन चालकांना ज्या दिवशी अधिका-यांच्या निवासस्थानी जाऊन वाहन ताब्यात घ्यावे लागते त्या दिवशी नजिकच्या रेल्वे स्थानकापासून निवासस्थानापर्यंतचे प्रत्यक्ष बसभाडे जेवढे असेल तेवढेच त्यांना परतावा म्हणून देण्यास मंडळ या ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.5 :**

विषय : म.पा.पु.व ज.नि.मंडळातील सहाय्यकांना रु.1600 - 2900 ही सुधारीत वेतनश्रेणी मंजूर करणे बाबत.

शासनाच्या सहाय्यकांच्या वेतनश्रेणीत दि.1.1.86 पासून बदल करण्यात आला आहे. मंडळातील सहाय्यकांना ती श्रेणी देण्याचे दृष्टीने सदर प्रस्ताव शासनाला सादर करण्यासाठी मंडळापुढे मांडला गेला . सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मंडळाने मान्यता दिली व खालील प्रमाणे

18

ठराव मान्य करण्यात आला. तसेच सदर श्रेणीला शासनाची मान्यता मिळेपर्यंत ही श्रेणी मंडळातील सहाय्यकांना लागू करू नये असे ठरले.

**ठराव :**

म.पा.पु.व ज.नि.मंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सहाय्यकांना वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.वेपुर.1290/प्र.क्र.74/94/सेवा- 10, मंत्रालय, मुंबई.32 दिनांक 22.4.94 मधील तरतुदीनुसार दि.1.1.86 पासून सुधारित वेतनश्रेणी रू.1640 - 2900 देण्यास मंडळ या ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

शासनाकडून वरील सुधारीत वेतनश्रेणी देण्यास मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यास मंडळ संमती देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.6 :**

जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प ठाणे येथे मंडळाचे नवीन प्रशासकीय इमारतीचा विस्तार व इतर कामे.

ठाणे येथील मंडळाच्या स्वत:च्या जमिनीवर इमारतीचा तळमजला पूर्वीच्या जागतिक बँक अर्थसहाय्यीत ठाणे शहर व इतर गावाच्या प्रकल्पामधून बांधून झालेला आहे. तेथे सध्या ग्रामीण पाणी पुरवठा प्रकल्पांचे नियंत्रणासाठी जागतिक बँक कक्ष कार्य करीत आहे. सध्याची जागा अपूरी असून ती दोन विभागीय कार्यालयांना कमी पडते. या इमारतीवर आणखी दोन मजले बांधण्याचा प्रस्ताव शासनाने मान्य केला आहे. ह्यास जागतिक बँकेची दिनांक 25.8.94 रोजी मान्यता मिळाली आहे. तसेच जागतिक बँकेची वरील कामाच्या निविदाच्या खर्चास मान्यता मिळाली असून प्रस्तुत निविदा स्विकारण्यात आल्या आहेत. या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष यांनी मान्यता दिली असून ही कार्यक्रम बाब , वरील केलेली कार्यवाही मंडळाच्या नजरेस आणण्यासाठी सादर केली आहे, असे जागतिक बँकेचे मुख्य अभियंता श्री.एस.के.पाटील यांनी सांगितले. याबाबत चर्चा होऊन खालील ठराव मान्य करण्यांत आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्पांतर्गत ठाणे येथे मंडळाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा विस्तार व इतर सलग्न कामे करण्यासाठीच्या निविदाच्या स्विकारार्थ जागतिक बँकेस सादर केलेल्या प्रस्तावास मंडळ कार्योत्तर मंजूरी देत आहे.

जागतिक बँकेची वरील निविदांच्या खर्चास अंतिम मान्यता मिळाली असून प्रस्तुत निविदा स्विकारण्यांत आल्या आहेत. त्यास मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

मंडळाच्या कार्यक्रम बाब संपल्यानंतर मंडळाचे सदस्य सचिव यांनी सर्वांचे आभार मानले व मंडळाची सभा समाप्त झाल्याचे सांगितले.